MHRG110006112023

| |
|---|
| **फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१५७/२०२३** |
| **(दिव्या मनवल विरुध्द देवीदास मनवल)** |

## <u>अर्ज निशाणी क्र.६ वर आदेश</u>

अर्जदारने प्रस्तुत अर्ज महिलांचा घरगुती हिंसाचारापासुन संरक्षण कायदा सन २००५ मधील कलम २३ अन्वये अंतरिम आदेश सामनेवाला क्र.१ यांचेकडून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जदारने असे कथन केले आहे की, अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह एकमेकांच्या पसंतीने हिंदू धर्मशास्त्रातील रितीरिवाजाप्रमाणे मौजे हनुमाननगर (रहाटाडवाडी), ता.तळा, जि.रायगड येथे दिनांक ०५.११.२००८ रोजी झालेला आहे. सामनेवाला क्र.१ हा अर्जदाराचा पती असुन सामनेवाला क्र.२ व ३ हे सासु–सासरे आहेत. सामनेवाला क्र.४ ही नणंद आहे. विवाहानंतर अर्जदार व सामनेवाला क्र.१ व ३ यांचेसोबत सामनेवाला क्र.१ ची पहिली आई यांचेसोबत सुखाने संसार करीत होती.

३. काही महिन्यानंतर अर्जदार व सामनेवाला क्र.१ व ३ यांचेसोबत मुंबई येथे रहावयास गेले. मुंबई येथे अर्जदार हिचेवर सामनेवाला क्र.१ हा संशय घेवुन मारहाण करुन लागला, सतत घालुन पाडून बोलू लागला. अर्जदार हिस सामनेवाला सतत त्रास देत असे व दुर्लक्ष करुन लागले. सामनेवाला क्र.१ यांचे संसारात लक्ष नव्हते. सामनेवाला क्र.३ यांची पहिली पत्नी मयत झाल्यामुळे त्यांनी

दुसरा विवाह केला व सामनेवाला क्र.४ ही सामनेवाला क्र.३ ची मुलगी असल्यामुळे तिचे देखील दोन विवाह यापुर्वी झालेले असताना ती सामनेवाला यांचे सोबत राहते.

४. सामनेवाला क्र.१ हा बाहेरख्याली स्वभावाचे असुन विवाहानंतर अर्जदार हिच्या निदर्शनास आले व याबाबत वेळोवेळी अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांच्या नातेवाईकांनी वाद मिटविलेले आहेत. सामनेवाला क्र.१ यांचा विवाहबाह्य संबंधाबाबत अर्जदार हिस माहिती पडल्याने सामनेवाला क्र.१ ला विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देवुन मारहाण केली व सामनेवाला क्र.२ व ३ यांनी सदर गोष्टीकडे दुर्लक्ष केले. सामनेवाला क्र.२ ते ४ हे अर्जदार हिस सतत घालुन पाडून बोलून मानसिक व शारिरीक छळ करीत असत. अर्जदार यांनी सदरची बाब माहेरी सांगितली असता, सामनेवाला क्र.१ यांनी अर्जदार यांची माफी मागितली. परंतु सामनेवाला क्र.१ यांना दारुचे व्यसन होते.

५. अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांनी सामनेवाला क्र.१ यांच्या भावाचा मुलगा निखील यास दत्तक घेतले असून त्याचे पालनपोषण अर्जदार हिने योग्यरित्या केले आहे. सामनेवाला क्र.१ हा निखील यास अर्जदारापासुन दूर ठेवुन तिला मानसिक व शारिरीक त्रास देत आहेत. सामनेवाला यांच्या घरी सामनेवाला क्र.४ ही विवाहीत असून देखील राहते व त्रास देते. सामनेवाला क्र.१ हा सामनेवाला क्र.२ ते ४ यांचया सांगण्यावरुन अर्जदार हिस मारहाण करत असे. सामनेवाला यांनी अर्जदार यांना खर्चासाठी किंवा औषधोपचारासाठी पैसे दिले नाहीत.

६. सामनेवाला क्र.१ हा रुस्तमजी स्कुलमध्ये कायमस्वरुपी नोकरीस

असुन त्यास रक्कम रु.२५,०००/– इतके वेतन आहे. सामनेवाला यांची आर्थिक परिस्थिती उत्तम आहे. शेतीवाडी असून त्यातून वार्षिक उत्पन्न रक्कम रु.५,००,०००/– इतके उत्पन्न मिळते. अर्जदार हिस कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. अर्जदार यांनी सामनेवाला क्र.१ यांचेकडून मुलभूत गरजा भागविण्यासाठी दरमहा रक्कम रु.१२,०००/– अंतरिम पोटगी व अर्जदार हिच्या राहण्याची स्वतंत्र व्यवस्था करावी अशी मागणी केली आहे.

७. सामनेवाला क्र.१ ते ४ यांनी लेखी म्हणणे निशाणी क्र.११ वर दिले. सामनेवाला यांनी अर्जदारासोबत विवाह व त्यांचे नाते मान्य केले आहे. सामनेवाला यांनी अर्जदारविरुध्द कौटुंबिक हिंसाचार केल्याचे अमान्य केले. सामनेवाला यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार व सामनेवाला यांच्या संसाराला १५ वर्षे उलटून गेलेली आहेत. कोणत्याही स्त्रीला इतक्या प्रदीर्घ कालावधीमध्ये झालेला त्रास ती सहन करु शकत नाही. पुढे सामनेवालाने कथन केले की, अर्जदार ही स्वतः बाहेरख्याली असून तिच्या कामावरील एका परपुरुषाची अश्लील संभाषणाचे कित्येक ऑडिओ सामनेवालाकडे आहेत. अर्जदाराने स्वतः बैठकीमध्ये अर्जदाराला सामनेवालासोबत नांदायचे नसल्याचे स्पष्ट करुन त्याच्यासोबत वैवाहिक संबंध नाकारलेले आहेत.

८. पुढे सामनेवालाने कथन केले की, निखील यास दत्तक घेतलेले नसून अर्जदार चुकीची व वायफळ वागू नये म्हणून सामनेवाला क्र.१ याने अर्जदारास मुल बाळ होत नाही म्हणून विरंगुळा व्हावा याकरिता निखील यास घरी ठेवले आहे.

MHRG110006112023

परंतु निखील मोठा झाल्यावर त्याच्या वडिलांनी त्याला स्वतःच्या घरी नेले. सामनेवाला क्र.४ ही सामनेवाला क्र.१ च्या घरात राहत नसून ती धुण्याभांडीची कामे करीत असून कामाच्याच ठिकाणी राहते. सामनेवाला क्र.१ ने अर्जदाराच्या अन्न, वस्त्र, निवारा, वैद्यकीय उपचार व इतर गरजा पुरवित होते. अर्जदाराच्या भावाकडून सामनेवाला क्र.१ याने कधीही रक्कम रु.५,००,०००/– मागितली नाही. रुमचे EMI सामनेवाला क्र.१ व त्याच्या आई वडिलांनी दिलेले आहेत. परंतु रुम आमची आहे, त्याचे हफ्ते वगैरे भरायची नाहीत असे भांडण केल्यामुळे सामनेवाला क्र.१ यांना हफ्ते भरण बंद करावे लागले. अर्जदाराच्या निष्फळ भांडणामुळे रुम बँकेने ताब्यात घेतली आहे ही गोष्ट अर्जदार लपवुन ठेवत आहेत.

९. अर्जदाराने सामनेवालाचा स्वतःच्या इच्छेने स्वमर्जीने त्याग केला आहे. त्याचवेळी अर्जदार ही सोन्याचे दागिने घेवुन माहेरी गेली. सामनेवाला क्र.१ हा एका शाळेमध्ये तात्पुरता नोकरीस होता परंतु आता त्याची नोकरी अर्जदाराने केलेल्या कोर्टकचेरीमुळे गमवावी लागली आहे. सामनेवाला क्र.१ याच्या नावावर कोणतीही शेती नाही. त्यांचे वडील अनंत म्हणजेच सामनेवाला क्र.२ यांच्या नावे केवळ २२ गुंठे जमीन आहे. अर्जदार ही मुंबई येथे नोकरी करीत असून नोकरीच्या ठिकाणी तिचे विवाहबाह्य संबंध आहेत. त्यामुळे अशा स्त्रीला पोटगी देणे सामनेवालावर बंधनकारक नाही. अर्जदार स्वबळावर उत्पन्न मिळवत आहे. ती तारखेला मुंबईवरुन येत असून गावी राहते असे खोटे सांगते. म्हणून सामनेवाला यांनी प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**१०.** अर्जदार व सामनेवाला यांचे विद्वान विधीज्ञ यांचे युक्तिवाद ऐकले. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले.

**११.** सामनेवाला यांनी अर्जदारांसोबतचा विवाह व त्यांचे नाते नाकारले नाही. प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अर्जदार व सामनेवाला यांचे वैवाहिक संबंध आजपर्यंत कायम आहे. अर्जदार ही रहाटवाडी, ता.तळा येथे राहते. तसेच सामनेवाला क्र.१ यांना रुस्तमजी शाळेत नोकरी अल्याचे अर्जदाराने कथन केले आहे. परंतु सामनेवाला क्र.१ याने नोकरी असल्याचे नाकारले आहे.

**१२.** अर्जदारने अर्जामध्ये तसेच शपथपत्रामध्ये स्पष्ट कथन केले आहे की, सामनेवाला क्र.१ हे अर्जदार हिला चारित्र्यावर संशय घेवुन शिवीगाळ, मारहाण करीत होते. सामनेवाला क्र.१ याने अर्जदाराला इतर खर्चासाठी व औषधोपचारासाठी पैसे दिले नाहीत व कोणत्याही गरजा पुरविल्या नाहीत. त्यामुळे अर्जदाराला शारिरीक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागले. तसेच सामनेवाला क्र.३ व ४ यांच्या सांगण्यावरुन सामनेवाला क्र.१ हा अर्जदारास त्रास देत होता. अर्जदाराने सामनेवाला क्र.१ हा मारहाण करीत असल्याबाबत दिनांक ०९.०५.२०२३ रोजी सामनेवाला यांच्या विरुध्द तळा पोलीस स्टेशन येथे तक्रार दिलेली आहे.

**१३.** अर्जदार हिने तिच्या कथनाच्या पृष्ठर्थ दिनांक ०९.०५.२०२३ रोजीचा अदखलपात्र गुन्ह्याची तक्रार अभिलेखावर दाखल केली आहे. सदर तक्रारीच्या अवलोकनावरुन प्रथमदर्शनी स्पष्ट होते की, अर्जदाराने सामनेवाला क्र.१

हिला चारित्र्यावर संशय घेवुन शिवीगाळ, मारहाण करीत होते. सामनेवाला क्र.१ याने अर्जदाराला इतर खर्चासाठी व औषधोपचारासाठी पैसे दिले नाहीत व कोणत्याही गरजा पुरविल्या नाहीत. त्यामुळे अर्जदाराला शारिरीक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागले. अर्जदाराने हिंसाचाराबाबत कथन केलेल्या ब–याच घटनावरुन व तक्रारीवरुन प्रथमदर्शनी असे सिध्द होते की, सामनेवाला यांनी अर्जदाराला हिन दर्जाची वागणूक देऊन अपमानास्पद वागवले. तसेच सामनेवाला क्र. १ यांनी अर्जदाराला मारहाण केल्याचे प्रथमदर्शनी दिसते. सदर अत्याचारावरुन प्रथमदर्शनी स्पष्ट होते की, अर्जदाराला मानसिक, भाविनक व शारिरीक कौटुंबिक हिंसाचाराला सामोरे जावे लागले आहे.

**१४.** सामनेवाला क्र.१ याने अर्जदाराला वैद्यकीय व इतर खर्च दिल्याचे त्यांच्या लेखी म्हणण्यामध्ये सांगितलेले नाही. सामनेवाला यांनी असेही सांगितले नाही की, त्यांनी अर्जदारांच्या वास्तव्यासाठी स्वतंत्र प्रयोजन केले आहे. सामनेवाला यांनी कथन केले की, अर्जदार ही मुंबईला येथे राहते व झोरोअस्ट्रीयन बँकेत काम करते. त्यासंदर्भात सामनेवाला यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसते की, सामनेवाला यांनी दिलेली पेमेंट स्लीप ही मे–जून २०१८ ची आहे व प्रॉव्हीडंट फंडची पावती २०१४–१५ ची आहे. फॉर्म नं.१६ सन २०१५–१६ चा आहे. तसेच अर्जदाराचे पगार मिळाल्याबाबत सन २०१९ पर्यंतचे स्टेटमेंट आहे. सामनेवाला यांनी दिलेले सर्व कागदपत्रे हे प्रस्तुत तक्रार दाखल करण्यापुर्वीच्या चार ते पाच वर्षांपुर्वीचे आहेत. सदर तक्रार ही सन २०२३ मध्ये दाखल केली असून अर्जदार ही सध्या नोकरी करते याबाबत कोणताही कागद अभिलेखावर नाही. अशा

परिस्थितीत अर्जदाराला स्वतःचे उत्पन्न आहे हे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. त्यामुळे कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ कलम ३ प्रमाणे शारिरीक, मानसिक त्रास तसेच आर्थिक संसाधनपासून पिडीत व्यक्तीला वंचित ठेवणे हे 'घरगुती हिंसाचार' च्या व्याख्येत मोडते.

**१५.** अर्जदारला अन्नवस्त्र खर्च देण्याची प्राथमिक जबाबदारी सामनेवाला क्र.१ यांची आहे. अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांनी मा.सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिर्णय ***रजनेश विरुध्द नेहा २०२१ एस.सी.सी ३२४*** मधील निर्देशाप्रमाणे दाखल केलेल्या दायित्वाबाबत प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.१६ व १७ येथे दाखल केले आहे. अर्जदार यांनी त्यांचे प्रतिज्ञापत्रामध्ये अर्जदार यांना कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. अर्जदाराच्या प्रतिज्ञापत्रामध्ये सामनेवाला हे रुस्तमजी शाळेत कार्यरत असल्याचे नमूद केले आहे. सदर बाब सामनेवाला क्र.१ याने नाकारली आहे. सामनेवाला क्र.१ च्या म्हणण्याप्रमाणे तो लेबर काम करतो. त्यामुळे अर्जदार यांनी सामनेवाला यांचेकडे उत्पन्नाचे साधन असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द केले आहे.

**१६.** अर्जदार व सामनेवाला यांचे राहणीमान व अर्जदार यांचे उदरनिर्वाह खर्च, अर्जदार यांचा वैद्यकीय व दैनंदिन खर्च तसेच, वाढत्या महागाईचा विचार केला असता अर्जदाराला सामनेवाला क्र.१ यांच्याकडून दरमहा रक्कम रु.३०००/-(रुपये तीन हजार मात्र) प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून मंजूर करणे न्यायोचित होईल.

**१७.** अर्जदार यांच्या राहण्याची स्वतंत्र व्यवस्था सामनेवाला क्र.१ यांनी करावी अशी अर्जदाराने मागणी केली आहे. परंतु अर्जदाराने ती भाड्याने राहते व

MHRG110006112023

त्याबाबत कोणताही पुरावा अथवा भाड्याची रक्कम याबाबत कथन केले नाही. तसेच तिच्या राहण्याची सोय कोठे व कशी करायची याबाबत स्पष्टपणे उल्लेख केलेला नाही. अभिलेखावर भाड्याने राहत असल्याबाबत व भाड्याच्या रक्कमेबाबत प्रथमदर्शनी पुरावा नाही. म्हणून सदरची मागणी ही अंतिम निकालाच्या वेळी पुराव्याअंती निश्चित करण्यात येईल.

**१८.** उपरोक्त कारणमिमांसेवरुन अर्ज अंशतः मंजूर करण्या योग्य आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

**अ.** प्रस्तुत अर्ज खर्चासह अंशतः मंजूर करण्यात येतो.

**ब.** सामनेवाला क्र.१ यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अर्जदार क्र.१ ला अंतरिम पोटगी म्हणून रक्कम रुपये ३,०००/– (रुपये तीन हजार मात्र) दरमहा अंतरिम अर्जाच्या दिनांकापासून म्हणजेच दि.२९.०५.२०२३ रोजीपासून मूळ अर्जावर न्यायनिर्णय होईपर्यंत द्यावे.

**क.** अर्जदाराच्या इतर मागण्या या अंतिम निकालावेळी विचारात घेण्यात येतील.

SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2026.07.04 17:59:43 +0530

माणगाव. **[श्रीमती अ.प्र.मानव(श्रीमती अ. ब. सोनटक्के)]**

दिनांकः–०४.०७.२०२६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माणगाव.

**MHRG110006112023**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | A. V. Chavan |
| Name of the Court | :- | Smt. A. P. Manav,<br>Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Mangaon. |
| Date of decision | :- | 04.07.2026 |
| Order signed by P.O. on | :- | 04.07.2026 |
| Order uploaded on | :- | 04.07.2026 |